# पुणे महानगरपालिका
## * स्थायी समिती *
## कार्यपत्रिका क्रमांक ३२

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **गुरुवार दि. ३/११/२०१६** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **महात्मा जोतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

### घनकचरा व्यवस्थापन आढावा

**विषय क्र. १६६९**

पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनाविषयी पंधरा क्षेत्रिय कार्यालयाकडील दि.१/१०/२०१६ ते दि.२३/१०/२०१६ अखेर पर्यंत पाठविलेला अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.सह.महा.आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन) यांचे जा.क्र.घकव्यका/२१८५ दि. २५/१०/२०१६ चे पत्र.

### उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा

**विषय क्र. १६७०**

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. २ चा माहे सप्टेंबर २०१६ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा. उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. २ यांचे जा.क्र. उप–२/११४५ दि. १७/१०/२०१६ चे पत्र.

### मा.सभासदांचे प्रस्ताव

**विषय क्र. १६७१**

मा.सौ.कविता वैरागे यांचे दि.२०/१०/२०१६ चे पत्र.

लोक शाहीर अण्णाभाऊ साठे सांस्कृतिक महोत्सव २०१६ निमित्त सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन खालील प्रमाणे करण्यास मान्यता देण्यात यावी.

| अ.क्र. | कार्यक्रम |
|---|---|
| १ | अण्णाभाऊ साठे यांनी लिहीलेल्या कथा कांदबरिचे ग्रंथ दिंडीचे आयोजन, अण्णाभाऊसाठे पुतळा ते गणेश कला क्रिडा रंममंच पर्यंत त्या सोबत बँड पथक/हलगी पथक, पालखी. र.रु. ११ हजार. |
| २ | संगित संध्या कु. पल्लवी घोडे व सहकलाकर, भावगित व अण्णाभाऊंच्या जीवनावरील गीते. र.रु. २५ हजार. |
| ३ | शहनाई वादन :– लक्ष्मण चव्हाण सनई सुंदरी व सहकलाकार आर्टिस्ट. र.रु. ५ हजार, अण्णाभाऊंच्या जीवनावर शाहरी जलसा मुजरा मानाचा साहित्य रत्नाला कार्यक्रम– सादरकर्ते – शाहीर श्री. बापू पवार आणि सह कलाकार र.रु. २५ हजार. |
| ४ | महोत्सव उद्घाटन समारंभ . |
| ५ | पुरस्कार वितरण – आद्यक्रांतीगुरू लहुजी वस्ताद साळवे पुरस्कार, भारतरत्न डॉ. बाबसाहेब आंबेडकर पुरस्कार, साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे पुरस्कार, सत्यशोधक मुक्ता साळवे पुरस्कार, शाहिर अमर शेख पुरस्कार, शाहिर गव्हाणकर पुरस्कार . र.रु. ४० हजार |
| ६ | समाजातील १० वी व १२ वी मध्ये पास झालेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ. र.रु. ३० हजार |
| ७ | अभिनेत्रींचा नृत्य जलसा सहभाग, जे.पी.ए. प्रस्तुत तारे नृत्यमय, भार्गवी चिरमुले, मानसी नाईक, तेजा देवकर, शर्वरी जमेनीस व सात संगित संच, सारेगम गायक , र.रु. ४ लाख ५० हजार. |
| ८ | आद्यक्रांती गुरु लहुजी वस्ताद यांचे जीवनावर व्याख्यान. मा. संपद जाधव., र.रु. ५ हजार |
| ९ | विनोदी एक पात्री, हास्य पंचमी, सादर कर्ते – बंडा जोशी, र.रु. ११ हजार |
| १० | शाहीर नामदेव वैरागर आणि बंधू पार्टी, चिंचोली देहू रोड, अण्णाभाऊंची गाणी, देशभक्ती वर गीते, शाहीरी पोवाडे व समाज प्रबोधन. र.रु. २१ हजार. |
| ११ | महामानवांच्या जीवनावर गीतांचा कार्यक्रम. सादरकर्ते – महाराष्ट्राचे सुप्रसिध्द गायक चंदन कांबळे, संजय लोंढे, उर्मिला धनगर , कार्तिकी गायकवाड , दिनकर शिंदे व वाद्यवृंद व इतर सामाजिक कार्यक्रम र.रु. ४ लाख |
| १२ | विशेष मुलाखती – समाजातील उच्च पदांवर असणा–या व्यक्तींच्या मुलाखती. |
| १३ | कवी व साहित्यिक संमेलन संयोजक– मा.सौ. उज्वला हातागळे र.रु. २५ हजार |
| १४ | अण्णाभाऊंचे जीवन साहित्य व सामाजिक चळवळ. वक्ते – डॉ. बाबुराव गुरव . र.रु. ११ हजार |

| | |
|---|---|
| १५ | मी महात्मा फुले बोलतोय – सादरकर्ते कुमार आहेर. र.रु. ५ हजार. |
| १६ | महोत्सव सांगता समारंभ . हास्यवल्ली हसू तर येणारच, कलाकार – भाऊ कदम, सुप्रिया पाठारे, कमलाकर सातपुते, आशिष पवार, योगेश सुपेकर र.रु. ४ लाख २५ हजार. |

साहित्यरत्न लोक शाहीर अण्णाभाऊ साठे सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करणे करीता पुढीलप्रमाणे पुणे महानगरपालिकेच्या सन २०१६-२०१७ चे अंदाजपत्रकात पुढील प्रमाणे तरतूद उपलब्ध आहेत.

सन २०१६-१७ पान क्र.१४९, यादी क्र. R2 शहरामध्ये विविध कार्यक्रम महोत्सव सम्मेलन/सहप्रायोजक तत्वावर कार्यक्रम साजरे करणे. अ.क्र. ७ अण्णाभाऊ साठे महोत्सव बजेट कोड नं. RE 11A275/R2-7 तरतूद र.रू.४५,००,०००/-

सांस्कृतिक कार्यक्रमांचे टेंडर न काढता कार्यक्रमात सहभागी कलाकारांना/संस्थांना आर.टी.जी.एस. मार्फत त्यांच्या बँक अकाऊंटवर मानधन अदा करणेस मान्यता डॉ. बाबासाहेब आंबेडकर महोत्सव साजरा करणे करिता यापुर्वीच घेण्यात आलेली असून तसा मा. स्थायी समितीचा ठराव पारित झालेला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर महोत्सवच्या धरतीवर साहित्यरत्न लोक शाहीर अण्णाभाऊ साठे सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करणेस व सहभागी कलाकारांना / संस्थांना आर.टी.जी.एस. मार्फत त्यांच्या बँक अकाऊंटवर मानधन अदा करणेस मान्यता देण्यात यावी.

## ठरावान्वये आलेले अभिप्राय

**विषय क्र. १६७२**

शहरातील नागरिकांसाठी पुणे महानगरपालिकेने पीएमपीएलच्या माध्यमातून दोन महिन्यातून एक दिवस पूर्णपणे मोफत बस प्रवासाची सुविधा देणेबाबत मा.आबा बागुल यांचे दि.१३/१०/२०१६ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १५२१ दि.१५/१०/२०१६ ला अनुसरुन मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. यांनी जा.क्र. पीएमपीएमएल/टीएम/२९४३ दि. १७/१०/२०१६ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी

## संकिर्ण

**विषय क्र. १६७३**

अतिक्रमण म्हणून उचलून आणलेले साहित्य (पथारी सामान,स्टॉल,हातगाडी इ.) सोडणेकामी वसूल करण्यात येणाऱ्या रिमूव्हल चार्जेस आकारणीचे दरात वाढ करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/अतिक्रमण/७३७ दि.२४/१०/२०१६ चे पत्र.

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**